# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in
Website: www.jdroamt.org

Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७
Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०१८/2598
दिनांक :- 12 NOV 2018

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषयः- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महा.डी.बी.टी. पोर्टलवर येणा-या अडचणीबाबत.**

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून आपल्या संस्थेमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना विविध योजनेचे लाभ घेण्याचे दृष्टीने शासनाने महा.डी.बी.टी. पोर्टल सुरु केलेले आहे. त्यानुसार आपल्या संस्थेची Institute Profile सुध्दा भरलेली आहे.

परंतु आपल्या संस्थेची Institute Profile भरतांना असे निदर्शनास आले की, काही संस्थांनी सदर पोर्टलवर संस्थेस मंजुर केलेली वर्षनिहाय शिक्षण शुल्क, विकास शुल्क व इतर शुल्क शाखानिहाय व वर्षनिहाय भरलेले नाहीत. त्यामुळे अश्या संस्थांचे शुल्क Fee Not Approved असे दाखवित आहे.

तेव्हा याबाबत आपणास कळविण्यात येते की, आपण आपल्या संस्थेची Principal Login मध्ये Fee Datails तपासणी करुन वरील प्रमाणे शुल्क पोर्टलवर Upload केली किंवा नाही याबाबत आपल्या स्तरावर शहानिशा करावी. जर आपण पोर्टलवर वरील प्रमाणे कार्यवाही केली असेल किंवा नसेल? त्यामुळे आपल्या संस्थेची वरील शुल्काची पोर्टलवर Fee Not Approved असे दाखवित असेल तर पुनश्चः वर्षनिहाय शाखानिहाय वरील रकमेची पोर्टलवर नोंद करुन अप्रुव्हड करण्याकरीता या कार्यालयाकडे पाठवावे. जेणेकरुन आपल्या संस्थेची Fee Approve करणे शक्य होईल.

**(डॉ. डी.व्ही. जाधव)**
सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेत स्थळावर टाकण्याकरीता.

E:\backup old\backup kadam\all manish letter ghts 30.doc